पुढारी



कोल्हापूर : दक्षिण आशियाई स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर नेपाळच्या पुरुष व महिला संघ कोल्हापुरात कबड्डी खेळाचे विशेष प्रशिक्षण घेत आहे. शिवाजी विद्यापीठ क्रीडा संकुलातील हॉलमधील मॅटवर हे प्रशिक्षण सुरू आहे. शुक्रवारी हे संघ राजर्षी शाहू कॉलेज व अहमदाबाद संघाविरोधात सराव सामने खेळले. यावेळी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. बी. एस. उलपे, भगवान पवार, प्रा. आण्णासाहेब गावडे, अजित पाटील, अशोक चव्हाण आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांची दिवाळी

## कुलगुरू, प्र-कुलगुरुंची उपस्थिती; भारतीय संस्कृतीची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** परदेशी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात दिवाळी साजरी केली. विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षातर्फे हा उपक्रम गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात भारतीय संस्कृतीविषयक माहिती या विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय कक्षामार्फत आयोजित कार्यक्रमात परदेशी विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिवाळी साजरी केली.**

आव

. शिर्के आणि कुलसचिव डॉ. ...लास नांदवडेकर यांनी भारतीय संस्कृतीतील दिवाळीचे महत्त्व, रूढी-परंपरा, रीतिरिवाज, आदींची माहिती दिली. त्यानंतर परदेशी विद्यार्थ्यांना कुलगुरुंच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. डी. के. गायकवाड, मेघा पानसरे, के. डी. सोनवणे, एन. जे. बनसोडे उपस्थित होते. इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक डॉ. ए. व्ही. घुले यांनी स्वागत केले. इंटरनॅशनल स्टुडंट हॉस्टेलचे रेक्टर डॉ. बी. यादव यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

ोटीस
, पोट
क्सी,
ल्हापूर
ोर या
ए ८४
जागा
रोड,
प्लॉट
.५ ची
सदर



कोल्हापूर : विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसोबत दिवाळीनिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.

# परदेशी विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरूंची दिवाळी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात अनेक परदेशी विद्यार्थी शिक्षणाच्या निमित्ताने वसतिगृहात रहात आहेत. या विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी साजरी करण्याची प्रथा आंतरराष्ट्रीय कक्षातर्फे सुरू करण्यात आली आहे. गेली तीन वर्षे सातत्याने परदेशी विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी साजरी केली जाते. त्या निमित्ताने भारतीय संस्कृतीविषयक माहितीचे आदान-प्रदानही त्यांच्यासमवेत केले जाते. यंदाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी परदेशी विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी साजरी केली.

विद्यापीठाच्या अतिथीगृहात आकाशकंदील व दीप प्रज्वलित करून दीपावली सणाच्या साजरीकरणास प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. शिंदे, प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी भारतीय संस्कृतीतील दिवाळीचे महत्त्व, रूढी-परंपरा, रीतिरिवाज आदींची माहिती दिली. परदेशी विद्यार्थ्यांना कुलगुरूंच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी या विद्यार्थ्यांसमवेत सुग्रास भोजनाचा आस्वादही घेतला. या कार्यक्रमास डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के. डी.सोनवणे, डॉ. एन. जे. बनसोडे उपस्थित होते. यावेळी इंटरनशनल अफेअर्स सेलचे संचालक डॉ. ए. व्ही. घुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. इंटरनॅशनल स्टुडंट हॉस्टेल रेक्टर डॉ. जे. बी. यादव यांनी संयोजन केले.